सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महाज्योती
ज्ञानदीप समतेचा
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/११४/२०२५-२६ दिनांक :- २३/०१/२०२६

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता निवड झालेल्या विस्तारित यादीतील विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१५/१२/२०२५ व प्रतिक्षा यादी दि.१४/०१/२०२६ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.१०/०१/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता जास्तीत जास्त विद्यार्थांना लाभ मिळावा या हेतूने अनेक विद्यार्थांनी महाज्योती कार्यालयात विद्यार्थी संख्या वाढवून देण्याकरिता विंनती केले असता दि.२०/०१/२०२६ रोजी झालेल्या महाज्योती संस्थेच्या मा.संचालक मंडळाच्या बैठकीत महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (संयुक्त गट ब व क) परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थी संख्या वाढविण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता मंजूर वाढीव विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करून पात्र विद्यार्थांची प्रवर्ग निहाय व समांतर आरक्षणानुसार विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. **निवड झालेल्या सर्व विद्यार्थांना प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता सूचना महाज्योतीच्या संकेतस्थळावर स्वतंत्र परिपत्रकाद्वारे निर्गमित करून देण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**